# राजर्षी शाहू महाविद्यालयाला राज्यपालांच्या हस्ते पुरस्कार

लातूर, ता. १७ : राजर्षी शाहूमहाविद्यालयाला सायबर क्षेत्रात केलेल्या उत्कृष्ट कार्यासाठी क्विक हिल फउंडेशनचा स्मार्ट सायबर क्लब रनर अप, तसेच प्रतीक्षा रमेश पांगे या विद्यार्थिनीला बेस्ट सेक्रेटरी रनर अप पुरस्कार राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्तेपुणेयेथे नुकताच प्रदानकरण्यात आला.



लातूर : राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना राजर्षी शाहू महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक.

वाढत्या सायबर गुन्हेगारीबद्दल समाजामध्ये जनजागृती करण्यासाठी राजर्षी शाहू महाविद्यालय आणि क्विक हिल फाउंडेशन (पुणे) यांच्या वतीने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा उपक्रम लातूर व त्याचबरोबर धाराशिव, सोलापूर, परभणी या जिल्ह्यांमधील शाळा, महाविद्यालये व ठिकठिकाणी राबविण्यात आला. या उपक्रमासाठी महाविद्यालयातील माहिती तंत्रज्ञान विभागातील बीसीए व बीएस्सी, सीएस अभ्यासक्रमाच्या ४० विद्यार्थ्यांनी सायबर योद्धा प्रा. ज्योती माशाळकर, प्रा. जयश्री जटाळ यांनी समन्वयक म्हणून काम केले. या उपक्रमांतर्गत एकूण १९० शाळा व महाविद्यालयांत, तसेच विविध शासकीय कार्यालये, कृषी उत्पन्न बाजार समिती, जिल्हा न्यायालय, बँका, साखर कारखाने इत्यादी ठिकाणीसायबर गुन्ह्यांपासून सावधगिरी कशी बाळगायची याबाबत जनजागृती करण्यात आली.

पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ.गोपाळराव पाटील, उपाध्यक्ष डॉ. पंढरीनाथ देशमुख, सचिव अनिरुद्ध जाधव, महाविद्यालयाचेप्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.